महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण),पुणे यांच्या अधिपत्याखालील डि.एल.एड. अभ्यासक्रम चालविणा-या शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी १० % जागा आरक्षित करण्याबाबत तसेच केंद्र शासनाच्या The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ च्या तरतुदीनुसार अपंगासाठी ५%जागा आरक्षित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमआयएस-४७१९/प्र.क्र.४५७/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २८ मे, २०१९.

<u>वाचा:-</u> (१) शासन निर्णय साप्रवि.क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२/२/२०१९.

(२)The Rights of Persons with Disabilities Act,२०१६.

(३) आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.अकआ/प्र-७/मोफत शिक्षण/क-३१ (२)/२०१७-१८/२८, दिनांक २०/६/२०१७.

(४) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) पुणे यांचे पत्र क्र.मराशेसंप्रप/सेवापूर्व शिक्षण/२०१९/१८६५, दिनांक १६/४/२०१९.

<u>प्रस्तावना:-</u>

(१) १०३ वी घटना दुरुस्ती कायदा,२०१९ च्या आधारे, महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय, साप्रवि.क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२/२/२०१९ अन्वये खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी, शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये १० % जागा आरक्षित करण्याबाबत खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत :-

(अ) भारतीय संविधानातील अनुच्छेद-१५(४) व (५) आणि अनुच्छेद-१६(४) अन्वये आरक्षणाचा लाभ देण्यात आलेल्या प्रवर्गांव्यतिरिक्त (मागासवर्गीय) राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी, शासकीय शैक्षणिक संस्था /अनुदानित विद्यालये ,महाविद्यालये, सर्व उच्च शिक्षण देणा-या शैक्षणिक संस्था, विनाअनुदानित विद्यालये/महाविद्यालये व शैक्षणिक संस्था यामध्ये एकूण प्रवेश द्यावयाच्या जागेमध्ये १० % आरक्षण विहित करण्यात येत आहे. सदर आरक्षण राज्यघटनेच्या अनुच्छेद-३०(१) अनुसार अल्पसंख्याक संस्थांना लागू होणार नाही.

वरील आदेशानुसार महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण),पुणे यांच्या अधिपत्याखालील डि.एल.एड. अभ्यासक्रम चालविणा-या संस्थामध्ये खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशासाठी १० % इतक्या जागा राखीव ठेवणे आवश्यक आहे.

(२) केंद्रशासनाने The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ हा अधिनियम दिनांक २८/१२/२०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द केला आहे. या अधिनियमाच्या कलम ३२ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे:-

(१) All Government Institutions of Higher Education and other Higher Education Institutions receiving Aid from the Government shall reserve not less than ५ % seats for persons with benchmark disabilities.

(२) The person with benchmark disabilites shall be given an upper age relaxation of five years for admission in institutions of higher education.

केंद्रशासनाच्या उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण),पुणे यांच्या अधिपत्याखालील डि.एल.एड. अभ्यासक्रम चालविणा-या शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये , प्रवेशासाठी ,लक्षणीय अपंगत्व असणा-या व्यक्ती / विद्यार्थ्यांकरीता ५ % इतक्या जागा राखीव ठेवणे आवश्यक आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

यासंदर्भात शासन पुढील प्रमाणे आदेश देत आहे:-

२. १०३ वी घटना दुरुस्ती कायदा २०१९ च्या आधारे, डि.एल.एड अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत राज्यातील आर्थिकदृटया दुर्बल घटकांसाठी, शासकीय / अनुदानित /विनाअनुदानित डि.एल.एड. कॉलेजमध्ये प्रवेशासाठी १० % जागा आरक्षित राहतील. तथापि हे आरक्षण अल्पसंख्याक संस्थांना लागू राहणार नाही. सदर आरक्षणाच्या अटी व शर्ती शासन निर्णय साप्रवि.क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२/२/२०१९ मध्ये विहित केल्यानुसार राहतील.

३. The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ च्या कलम ३२ (१) मधील तरतुदीनुसार ,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे यांच्या अधिपत्याखालील डि.एल.एड. अभ्यासक्रम चालविणा-या शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये प्रवेशासाठी, लक्षणीय अपंगत्व असणा-या व्यक्ती / विद्यार्थ्यांकरीता (Person with Benchmark Disabilities) ५ % इतक्या जागा आरक्षित राहतील. Person with Benchmark Disabilities याबाबत सदर अधिनियमातील तरतूद विचारात घ्यावी.

४. वरील निर्णयांची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण),पुणे यांच्या स्तरावरुन करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५२८१६५३३२४८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, serialNumber=007d84f8ce44beba86b0ca2d0155d67cc1a9db4f8d59bc9d8067628d62bcdc1a, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2019.05.29 13:39:29 +05'30'

(स्वा.म.नानल)
उपसचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,
१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) पुणे
६. निवड नस्ती (एसएम-२).